नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १७/१०/२०२६ (शनिवार )

---

## महामार्ग क्रमांक ५३ वरील गॅस गळतीच्या घटनेत वडोदा पोलीसांची तत्पर कार्यवाही;
## प्रभावी उपाययोजनांमुळे संभाव्य दुर्घटना टळली

पोलीस स्टेशन वडोदा:— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात तसेच श्री शशांत एम एम ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांच्यासह वडोदा पोलीसांनी गॅस गळती घटनेत तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून विविध यंत्रणांच्या समन्वयातून संभाव्य दुर्घटना टाळण्यात यश मिळविले आहे.**

दिनांक १६/१०/२०२६ रोजी १८:३० वाजताच्या सुमारास डायल ११२ वाहनाद्वारे महामार्गावर पेट्रोलिंग करीत असतांना वडोदा पोलीसांना माहीती मिळाली की, महामार्ग क्र. ५३ वरील सावळी फाटा परिसरात गॅस सिलिंडर वाहतूक करणाऱ्या ट्रकमधून गॅस गळती होत आहे. सदर माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी सदर माहीती सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांना दिली. त्यांनी पोलीस स्टाफ सह तातडीने घटनास्थळी गाठले. ट्रक क्रमांक एनएल—०१—ए एल —११०१ मधून सीएनजी गॅस सिलेंडर मधुन गळती होत असल्याचे दिसले. सदर वाहनातील सिलेंडर मध्ये सुमारे ११०० किलो गॅस भरलेला होता. सदर ट्रक रिलायन्स कंपनी रायपुर येथुन नमुद सिलेंडर घेवुन गौंडखैरी कडे निघाले होता.

संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या. घटनास्थळी पोलीसांनी महामार्गाच्या दोन्ही बाजूंची वाहतूक सुमारे ५०० मीटर अंतरापर्यंत थांबवून योग्य बॅरिकेटिंग केले. सावळी फाटा परिसरातील दुकानदारांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सूचना देऊन परिसर रिकामा करण्यात आला. तसेच गॅस गळतीमुळे आग लागण्याची किंवा अन्य दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत परिसरातील वीजपुरवठा बंद

करण्यात आला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच मौदा येथील जिओ सीएनजी कंपनीच्या तज्ज्ञ पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

दरम्यान, महामार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी वाहतुक शाखा पारडी, नागपुर शहर पोलीस स्टेशन मौदा, महामार्ग पोलीस तसेच जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण यांच्याशी समन्वय साधण्यात आला. त्यानुसार संबंधित मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. तसेच टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांच्या मदतीने वाहनचालकांना दिशादर्शक सूचना देण्यात आल्या.

जिओ सीएनजी कंपनीच्या तज्ज्ञ पथकाने घटनास्थळी पोहोचून परिस्थितीची पाहणी केली व गॅस गळती थांबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली. गॅस गळतीवर नियंत्रण मिळविल्यानंतर संबंधित ट्रक सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आला. परिस्थिती सुरक्षित असल्याची खात्री केल्यानंतर महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. वडोदा पोलीसांनी वेळीच परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वाहतूक नियंत्रण, परिसर सुरक्षित करणे, वीजपुरवठा खंडित करणे आणि विविध यंत्रणांशी समन्वय साधणे या उपाययोजना केल्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यात यश आले. **या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाली नाही.**



# नागपुर ग्रामीण पोलीसांनी ऑपरेशन शोध V मोहीमे अंतर्गत हरवलेल्या/पळविलेल्या, (अपहरन, अपनयन) झालेले आणि बेपत्ता प्रकरणातील व्यक्तींचा/बालकांचा शोध घेवुन एकुण ११५ प्रकरणांची उकल केली.

मा. अपर पोलीस महासंचालक, महीला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाने दिनांक २९/०९/२०२६ ते १६/१०/२०२६ या कालावधीत संपुर्ण राज्यात हरवलेल्या/ पळविलेल्या ( अपहरण, अपनयन ) झालेल्या १८ वर्षावरील स्त्री, पुरूष तसेच १८ वर्षाखालील बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन शोध V मोहीम राबवण्यात आली. या मोहीमे अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हा येथे हरविलेल्या/ पळविलेल्या प्रकरणांमधील १८ वर्षावरील स्त्री, पुरूष तसेच १८ वर्षाखालील बालकांचा शोध घेण्याकरीता विविध शोध पथके नेमुन यशस्वीरित्या मोहीम पार पाडण्यात आली. मा.श्री हर्ष ए. पोद्‌दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांच्या मार्गदर्शनात या मोहिमेचे नेतृत्व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी केले असुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभाग, नागपुर ग्रामीण चे प्रमुख, पोलीस निरीक्षक श्री मिलींद तायडे, भरोसा सेल, नागपुर ग्रामीण चे प्रमुख, पोलीस निरीक्षक श्री गणेश फुलकवर यांनी त्यांचे पथकांसह शोध मोहीम राबविली

**प्रत्येक पोलीस स्टेशन ला १ असे एकुण २४ शोध पथक स्थापन करण्यात आले होते. स्थापन केलेल्या विविध पथकांनी तांत्रिक पुरावे तसेच गुप्तबातमीदार यांच्या मदतीने हरविलेल्या/पळविलेल्या व्यक्तींचा कसुन शोध घेतला. नागपुर ग्रामीण जिल्हयात “ ऑपरेशन शोध V ” मोहीमेअंतर्गत दिनांक २९/०९/२०२६ ते १६/१०/२०२६ रोजी पर्यंत हरविलेल्या/पळविलेल्या ७० महीला ,३९ पुरूष, ६ बालीका असे एकुण ११५ व्यक्तींचा शोध घेण्यात आला. अशा एकुण ११५ प्रकरणांची उकल केली आहे.**

# दुचाकी चोरीचा गुन्हा उघड,  आरोपी अटक
# पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री किशोर श्शेरकी ,प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन पारशिवणी यांच्या नेतृत्वात पारशिवनी पोलीसांनी दुचाकी चोरीचा गुन्हा उघड करून दुचाकी जप्त करत आरोपीला अटक केले आहे.

पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत फिर्यादी आकाश सुनिल गजभिये, वय ३१ वर्ष, रा. सालई मोकासा, ता. पारशिवनी, जि. नागपूर यांनी दिनांक ०६/१०/२०२६ रोजी पारशिवनी येथे येवुन रिपोर्ट दिली की, फिर्यादी यांची बजाज कंपनीची मोसा क्र. एम एच—४०/सि.व्ही—२६३३ ही अंगणात उभी ठेवली असता कोणीतरी अज्ञांत चोराने चोरून नेली. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ३०३ (२) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत दाखल अउघड गुन्हयाचा तपास करीत असतांना पारशिवनी पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी **प्रविन धनराज लांजेवार, राह. सालई मोकासा ता. पारशिवनी** याला निष्पन्न केले. आरोपीला नंदनवन नागपूर शहर येथुन ताब्यात घेवुन त्यास कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने दुचाकी चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीने चोरी केलेली **दुचाकी** बजाज कंपनीची मोसा क्र. एम एच—४०/सि.व्ही—२६३३ **किंमती ४०,०००/— रूपयांचा मु**द्देमाल जप्त केला आहे.




## ०२ पाहिजे आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहीमेअंतर्गत दिनांक १६/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय माहीती तसेच तांत्रिक पुराव्याचे सखोल विश्लेषण करून खालील प्रमाणे ०२ पाहीजे आरोपींचा शोध घेतला आहे.

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दाखल असलेल्या अप. क्र. ३८४/२०२० कलम ३६३ भादंवि या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी मंगेश श्रीराम गाठे, वय ३० वर्षे, रा. नरखेड, ता. मुलताई जि. बैतूल ह. मु. केतापार तह कळमेश्वर हा गुन्हा दाखल झाल्यापासुन सन २०२० पासुन मिळुन येत नव्हता. या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद पाहीजे आरोपीचा शोध घेवुन त्याला मौजा केतापार, कळमेश्वर येथुन ताब्यात घेतले आहे.

पोलीस स्टेशन काटोल येथे दाखल असलेल्या अप. क्र. ३५७/२०२६ कलम ११ (१), (अ), (ड), (फ) प्राण्यांना करतेने वागवण्यास प्रतिबंधक अधिनियम १९६०, कलम ५ (अ) (१), ५ (अ) (२), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५, कलम ४९, ३(५) भारतीय

**न्याय संहिता २०२३ चे गुन्ह्यातील पाहिजे आरोपी १) मुस्तकीम शाह शफाकत शाह, वय ३२ वर्षे, राहणार लालखडी अमरावती २) शेख इरशाद शेख युसुफ, वय २९ वर्षे, रा. हैदरपुरा अमरावती हे गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हते. या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद पाहीजे आरोपींचा शोध घेवुन त्यांना अमरावती येथुन ताब्यात घेतले.**

**दोन्ही आरोपींना पुढील कारवाई करीता संबधीत पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये १० गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १६/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वेलतूर** अंतर्गत आरोपी देवचंद हरि शिवनकर, वय ४० वर्ष, रा. जामगांव, ता. जि. भंडारा ह.मु. पिपरी मुंजे, ता. कुही, जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत आरोपी नामे १. गुलामअली राशीदअली अन्सारी, वय ३५ वर्ष, रा नागपुर २. रवि शामशेखर सिंह, वय ३२ वर्ष, रा. नागपुर ३. गणेश किशोर शर्मा, वय ३८ वर्ष, रा. नागपुर ४. सोनुसिह फुलसिंह, वय ३१ वर्ष, रा. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत आरोपी नामे दसरु सीमारू धिदोंळा, वय ५० वर्ष, रा. निमखेडा ता. मौदा, जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी नामे पूष्पेन्द्र धरमपाल ठाकूर, वय ४५ वर्ष, रा. खरगपूर बाजे उ. प्र. ह. मू. भारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी नामे मंगु तारासिंग जाधव, वय ५८ वर्ष, रा.

माहुरखोरा, ता. काटोल जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी नामे बबलूनाथ बापूनाथ सोलंकी, वय ४० वर्ष, रा. हामूखेडी, ता. जि. उज्जेन मध्यप्रदेश हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत आरोपी नामे अविनाश सुभाष डुभरे, वय ५५ वर्षे, रा. प्रभात क्र. ५, नवीन वस्ती बुट्टीबोरी ता. जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैध जुगार खेळणाऱ्यांवर ०३ गुन्हे नोंद.

दिनांक १६/१०/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या तसेच सट्टापट्टीचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २७५५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन अरोली, मोहपा, नरखेड मध्ये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत** आरोपी नामे १. अमरसींग सिताराम भटटेचोर, वय ४८ वर्ष, रा. अडेगाव, ता. मौदा, जि. नागपुर २) अरूण कुभरे, वय ३६ वर्ष, ३) प्रमोद बाबुराव कुंभरे, वय ३७ वर्ष दोन्ही रा. सावंगी, ता. मौदा, जि. नागपुर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आल्याने एकुण ०३ आरोपींविरूद्ध ०१ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत** आरोपी नामे भैयाजी गिरी, रा. मोहळी हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** आरोपी नामे भरतसिंग गणपतसिंगप चौरसिया, वार्ड नं. ०४, बेलोना ता. नरखेड हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, एकुण ०५ आरोपीविरूद्ध एकुण **०३ गुन्हे** नोंद करण्यात आले.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन तसेच वाहतूक करणाऱ्यांवर १३ गुन्हे दाखल,

**दिनांक १६/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १३ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १. विना क्रमांकाचे वाहनाचा चालक २. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी नामे उमेद जुगलकिषोर भाटी, वय ३१ वर्ष, रा. अजंनगाव सुर्जी, जि. अमरावती याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे पवन ज्ञानेश्वर भिवनकर, वय २९ वर्षे, रा. कवठा, ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही येथे** १. कमलेश युवराज रामटेके, वय ३८ वर्ष, रा. वडेगाव, ता. कुही, जि. नागपुर २. केदारनाथ मसाराम बावणे, वय ३० वर्ष, रा. साकोली, ता. जि. भंडारा ३. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे १. छोटु नारायण वलके, वय ५५ वर्ष, रा. रानंमागली, ता. भिवापूर, जि. नागपूर २. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे श्रीकांत एकनाथ मोहीनकर, वय ४२ वर्ष, रा. कावरापेठ, ता. उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे १. रोहीत हरिराम धुर्वे, वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र ०५, २. विशाल जुप्पालाल जामई छिदवाडा म.प्र ह. मु सानईधाभा ता.हिंगणा जि.नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १. संदीप उर्फ लाखन केशवराव उईके, वय ३५ वर्ष, रा. खरसोली मोवाड, ता. नरखेड जि. नागपूर २. साहेबराव किसनराव धुर्वे, वय ६० वर्ष, रा. खामली, ता. काटोल, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २७०० मिली देशी दारू, २४ लीटर मोहाफुल दारू असा एकुण १८,६००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६८१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १७/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६८१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ८८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी, अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे २० आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १४७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.










जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर